पुणे पोलीस

**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ १००४ /२०२४** **दिनांक :- ७ /०२/२०२४**

**<u>प्रेसनोट</u>**

बंडगार्डन, कोरेगांव पार्क वाहतूक विभागाअंतर्गत साधु वासवानी पुल हा धोकादायक झाला असल्याने पुणे महानगरपालिकेकडून सदरचा पुल पाडुन नव्याने बांधण्यात येणार आहे. साधु वासवानी पुल पाडुन तो पुन्हा नव्याने बांधुन पुर्ण होईपर्यंत कोरेगांव पार्क, बंडगार्डन वाहतूक विभागाचे हद्दीमध्ये वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. सदर परिसरातील वाहतूक सुरळीत ठेवणेकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी शशिकांत बोराटे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर कोरेगांव पार्क व बंडगार्डन वाहतूक विभागाचे हद्दीतील वाहनांचे वाहतूकीमध्ये पहिल्या टप्प्याअंतर्गत प्रायोगीक तत्वावर **दिनांक १०/०२/२०२४ ते पुढिल आदेशापर्यंत** खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

**<u>बंडगार्डन, कोरेगांव पार्क वाहतूक विभागाअंतर्गत</u>**

❖ मोरओढा चौक ते ब्ल्यु डायमंड हॉटेल चौक दरम्यान साधु वासवानी पुलावरुन हलक्या वाहनांसाठी एकेरी वाहतूक सुरु राहिल.

❖ **आय.बी. चौक ते सर्किट हाऊस चौक दरम्यान जनरल अरुण कुमार वैद्य मार्गावर एकेरी वाहतूक करण्यात येत आहे.** मोरओढा चौकातुन आय.बी. चौकाकडे जाण्यासाठी मोरओढा चौक सरळ सदन कमांड समोरुन कौन्सील हॉल चौकामधुन उजवीकडे वळण घेवून जावे.

पी.एम.पी.एम.एल. बसेस व इतर बसेसनी मोरओढा चौक सरळ काहुन रोड सिग्नलवरुन डावीकडे वळण घेवून तारोपोर रोड जंक्शन येथुन उजवीकडे वळण घेवून सरळ ब्ल्यु नाईल चौक येथून उजवीकडे वळण घेवून सरळ मंगलदास चौक येथून इच्छितस्थळी जावे.

❖ **ब्ल्यु डायमंड चौकामधुन साधु वासवानी पुलावर प्रवेश बंद राहिल.**
**पर्यायी मार्ग :-** ब्ल्यु डायमंड चौक ते मोबोज चौक एकेरी मार्ग करण्यात येत आहे. मोबोज चौक, डावीकडे वळण घेवुन मंगलदास चौक, डावीकडे वळण घेवुन आय.बी. चौक, डावीकडे वळण घेवुन सर्किट हाऊस चौक येथुन इच्छितस्थळी जावे.

❖ **ब्ल्यु डायमंड चौक ते मोबोज चौक एकेरी मार्ग केल्याने मोबोज चौकामधुन मंगलदास रोड मार्गे हॉटेल ब्ल्यु डायमंड चौकाकडे प्रवेश बंद राहिल.**
**पर्यायी मार्ग :-** मोबोज चौकामधुन बंडगार्डन रोडने श्रीमान हॉटेल चौक, उजवीकडे वळण घेवून हॉटेल श्रीमान लेनमधुन कोरेगांव पार्क जंक्शन येथुन इच्छितस्थळी जावे.

❖ **आय.बी. जंक्शन ते सर्किट हाऊस चौक हा एकेरी मार्ग आवश्यकतेप्रमाणे दुहेरी करण्यात येईल.**

**( शशिकांत बोराटे )**
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक,पुणे शहर

**प्रति,**
**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,**
**नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – १**

**प्रत :- सर्व संबंधितांना**